**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय,.....

**सभापती :** माननीय विरोधी पक्ष नेते आपल्याला काय सांगायचे आहे ?

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, राज्याचे माजी उप मुख्यमंत्री......

**सभापती** : आपण कोणत्या माध्यमातून हा विषय मांडत आहात ?

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, आम्ही आपल्याकडे म.वि.प. नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. राज्याचे माजी उप मुख्यमंत्री .....

**सभापती** : मी आपल्या निदर्शनास आणून देतो की, आपण सुरुवातीला नेहमी प्रश्नोत्तराच्या तासावर चर्चा करतो आणि त्यानंतर नियम 289 अन्वये दिलेल्या सूचना घेतो.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय श्री.छगन भुजबळ हे या सभागृहाचे नेते, माननीय विरोधी पक्ष नेते आणि सदस्य होते. या बरोबरच ते राज्याचे उप मुख्यमंत्री होते. परंतु ज्या पध्दतीने त्यांना काल अटक झाली त्या अटकेचे पडसाद संपूर्ण महाराष्ट्रभर उमटले आहेत. प्रत्येक ठिकाणी बंद आणि रास्ता रोको केला जात आहे. सभागृहाचे सदस्य ज्या पध्दतीने चौकशीला सामोरे जात असताना त्यांना अटक झाली त्या विषयी.....

**सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेते, सन्माननीय श्री.छगन भुजबळ यांना झालेली अटक हा प्रत्येक माणसाच्या हृदयात सलणारा विषय आहे. आपण हा विषय नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न करीत आहात. हा विषय प्रश्नोत्तराच्या तासानंतर घ्यावयाचा हा पहिला मुद्दा आहे आणि त्यानंतर....

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज सुरु झाल्यानंतर प्रश्नोत्तराचा तास घ्यावयाचा ही प्रथा आणि परंपरा आहे. त्यामुळे आपण अगोदर प्रश्नोत्तराचा तास घ्यावा. त्यानंतर कोणतेही कामकाज सुरु होण्यापूर्वी माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे काय म्हणणे आहे हे ऐकून घ्यावे. मी पुनश्च विनंती करतो की, अगोदर प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात करावी.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकाच वेळी बोलतात.)

**सभापती** : आपल्याला सभागृहाचे कामकाज करु द्यावयाचे नसेल तर हे सभागृह अर्ध्या तासासाठी स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.02 ते 12.32 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

------

बी....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मुझफ्फर हुसेन)**

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून मोठ्याने बोलण्याचा व घोषणा देण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, राज्यात काय चालले आहे ? सभागृहाचे माजी माननीय विरोधी पक्ष नेते .... (अडथळा)

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, राज्याचे माजी माननीय उप मुख्यमंत्री श्री. छगन भुजबळ यांच्यावर .... (अडथळा) .... यासाठी ही कारवाई झाली आहे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, चुकीच्या पध्दतीने कारवाई झाली आहे. .... (अडथळा)

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, राज्याच्या पुरोगामी विचारांना .... (अडथळा) .... विरोधी पक्षनेता म्हणून या सभागृहाचे .... (अडथळा)

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य घोषणा देत वेलमध्ये येतात.)

सभापती महोदय, ....

**तालिका सभापती** : माझी विरोधी पक्षाला विनंती आहे की, आपण आता प्रश्नोत्तराच्या तासाने सभागृहाच्या कामकाजाला सुरुवात करू या. .... (अडथळा) .... अशा स्थितीत सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य नसल्याने मी सभागृहाची बैठक 20 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.34 ते 12.54 पर्यंत स्थगित झाली.)

----

....C

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.मुझफ्फर हुसेन)**

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**राखून ठेवण्यात आलेल्या प्रश्नांबाबत**

**तालिका सभापती :** आजच्या कामकाज पत्रिकेतील राखून ठेवण्यात आलेले तारांकित प्रश्न सभापती महोदयांच्या निदेशानुसार पुढे ढकलण्यात येत आहेत.

------------

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** तोंडी उत्तरे

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

उच्च माध्य मक वभागाच्या पायाभूतपेक्षा वाढीव पदांच्या
मान्यतेबाबत व मंजूर पदांच्या वेतनाबाबत

**(१)** * १५८८७ श्री.रामनाथ मोते, श्री.नागो गाणार, डॉ.अपूर्व हिरे, श्री.क पल पाटील, ॲड.निरंजन डावखरे : सन्माननीय शालेय शक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन २०१०-२०११ अखेर उच्च माध्य मक वभागाच्या पायाभूतपेक्षा वाढीव ३३४ पदांना माहे डसेंबर, २०१५ मध्ये पुरवणी मागण्यांमध्ये मंजूर केलेले वेतन अनुदान केव्हा अदा करण्यात आले आहे व केव्हा पासून,
(२) असल्यास, शासनाने मान्यता दिलेल्या उर्वरीत सुमारे ६०० पदांना वेतन अनुदान अद्यापही मंजूर न करण्याची कारणे काय आहेत,
(३) सन २०११-२०१२ ते सन २०१४-१५ अखेरच्या उच्च माध्य मकच्या पायाभूतपेक्षा वाढीव पदांची वभाग निहाय संख्या कती आहे,
(४) सदरचे प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी शक्षण संचालनालय, माध्य मक व उच्च माध्य मक शक्षण, पुणे यांचेकडून शासनास केव्हा प्राप्त झाले आहेत,
(५) प्रस्ताव प्राप्त झाले असल्यास, अद्यापही या प्रस्तावांना मान्यता न देण्याची कारणे काय आहेत व सदरच्या प्रस्तावांना केव्हा मान्यता दिली जाणार आहे ?

**श्री. वनोद तावडे :** (१) दिनांक ५.२.२०१६ च्या शासन निर्णयानुसार ३३४ पदांना माहे फेब्रुवारी, २०१६ पासून वेतन सुरु करण्यात आले आहे.
(२) सदर पदांबाबत भरती प्र क्रया वहित मार्गाने न झाल्याने तसेच बिंदूनामावलीनुसार पदे नसल्याने वैयक्तिक मान्यता प्रदान करण्यात आलेल्या नाहीत त्यामुळे सदर पदांना वेतन अनुदान मंजूर करण्यात आलेले नाही.
(३) सन २०११-१२ ते २०१३-१४

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.15887........

| अ. क्र. | वभाग | पूर्णवेळ | अर्धवेळ | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | कोल्हापूर | १०८ | ७९ | १८७ |
| २ | पुणे | ७५ | ६३ | १३८ |
| ३ | अमरावती | ०५ | ०२ | ०७ |
| ४ | औरंगाबाद | २७ | १९ | ४६ |
| ५ | नागपूर | ०८ | १० | १८ |
| ६ | ना शक | ६५ | ०६ | ७१ |
| ७ | मुंबई | ६४ | ३० | ९४ |
| ८ | लातूर | ४० | ०९ | ४९ |
| | एकूण | ३९२ | २१८ | ६१० |

(४) शक्षण संचालनालयाच्या दिनांक ७७२०१४ व दि. ३०.५.२०१५ च्या पत्रान्वये वाढीव पदांचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे.
(५) सदर वाढीव पदांबाबतच अ धकची माहिती क्षेत्रिय कार्यालयाकडून माग वण्यात आलेली आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, उच्च माध्यमिक विभागाच्या पायाभूतपेक्षा वाढीव 334 पदांना शासनाने मंजुरी दिलेली आहे. या पदांच्या वेतनासाठी 13 कोटी 92 लक्ष रुपये शासनाने मंजूर केलेले आहेत. पुरवणी मागण्यांमध्ये सदरची रक्कम मंजूर झालेली आहे. शासनाने फक्त फेब्रुवार,ी 2016 चे वेतन दिलेले आहे. मंजूर झालेली रक्कम 334 पदांसाठी संपूर्ण वर्षासाठी आहे. तरी संपूर्ण वर्षासाठी देय असलेली रक्कम तातडीने अदा करण्याचे आदेश.........

**तालिका सभापती :** सभागृहात कामकाज करण्यासारखी परिस्थिती नसल्यामुळे मी सभागृहाचे कामकाज 10 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.50 ते दुपारी 01.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-------------

यानंतर श्री.बोरले.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**उप सभापती :** माझी आपल्याला विनंती आहे की, मला थोडे शांत बसू द्यावे. मला तुम्ही काय बोलत आहात हे ऐकण्याच्या मन:स्थितीत येऊ द्यावे. कारण, एवढ्या गोंधळात मला आपले म्हणणे ऐकून घेता येणार नाही. आपण कृपया दोन मिनिटे शांत बसावे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माननीय श्री.भुजबळ साहेब या सभागृहाचे विरोधी पक्षनेते होते. ते या सभागृहाचे नेते होते. ते राज्याचे उप मुख्यमंत्री देखील होते. मागील 25 वर्षे श्री.भुजबळ साहेबांचे महाराष्ट्राच्या राजकारणात मोठे योगदान राहिलेले आहे. आज त्यांच्यावर अशा पद्धतीची रात्रीची घटना होणे आणि त्या घटनेमुळे संपूर्ण राज्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला आहे....

( विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया आपल्या जागेवर बसावे. माननीय विरोधी पक्षनेते काय बोलतात ते आपण ऐकून घ्यावे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, एक पुरोगामी नेता, ज्यांनी राज्यात पुरोगामित्व टिकविले, ज्यांनी राज्यात समता आणि ममतेचे राजकारण केले अशा नेत्याला.....

**उप सभापती :** सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक संपूर्ण दिवसासाठी स्थगित करतो.

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या बुधवार, दिनांक 16 मार्च, 2016 रोजी दुपारी 12.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 01 वाजून 06 मिनिटांनी, बुधवार, दिनांक 16 मार्च, 2016 रोजीच्या दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION